महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशन
जावक क्रमांक /2025
फोन नं. 02586 - 222101
Email -chopdarural@gmail.Com
दिनांक 25/07/2025

# प्रेस नोट

## चोपडा ग्रामिण पोलीस स्टेशन यांची दमदार कामगिरी, अफु या अंमलीपदर्थाची वाहतुक करणाऱ्या कारच्या पुढे वॉचर म्हणुन सोबत चालणारे कारमधील दोन आरोपी जेरबंद

पारउमटी ता बरला जि.बडवाणी (मध्य प्रदेश) या गावाची सीमा महाराष्ट्र राज्याच्या चोपडा तालुक्यातील उमटी या गावाला लागुन आहे. मध्य प्रदेश राज्यातुन अवैध गावठी कट्टे (अग्निशस्त्र) , गांजा, गावठी दारु,,गुटखा, ईत्यादीची चोरी छुपे वाहतुक हात असल्याने त्यांच्या गैकृत्यास आळा बसावा याकरीता मागील एक महीन्यापासुन मा.पोलीस अधिक्षक सो जळगाव मा.डॉ महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक चाळीसगांव, कविता नेरकर मॅडम, मा. पोलीस उपअधिक्षक चोपडा उपविभाग , श्री आण्णासाहेब घोलप, यांच्या संकल्पनेतुन उमटी व सत्रासेन परिसरात २४ X ०७ अशी नाकाबंदी लावण्यात आली आहे.

दिनांक २५/०७/२०२५ रोजी सत्रासेन नाका येथे नाकाबंदी ड्युटीस असलेले पोकॉ/९२७ रावसाहेब एकनाथ पाटील, सफौ/२७९३ शिवाजी बाविस्कर यांना उमटी नाक्याकडुन सत्रासेन बाजुकडे दोन कार येतांना दिसल्या. म्हणुन त्यांनी पहिली गार थांबवली सदर कार ही स्विप्ट कार क्रमांक GJ ०६, LS ००७५, अशी होती तेव्हा व ती चेक करीत असतांना त्याचे पाठीमागील कार ही नाकाबंदी चालु असुन वाहनांची चेकिंग होत आहे असे मागील कार वरील इसमांना समजल्याने त्यांनी तेथुन महिंद्रा XUV५००, MH १२, LD ८१४१ कार यु-टर्न करुन माघारी फिरु लागले त्याचवेळी चेकिंगसाठी थांबवलेली कारही नाकांबदी करीता लावलेला लोखंडी थांबा तोडुन पळुन गेल्याने सदर घडलेला प्रकार पोकॉ/९२७ रावसाहेब एकनाथ पाटील, सफौ/२७९३ शिवाजी बाविस्कर यांनी फोन करुन पोलीस निरीक्षक अनिल विठ्ठल भवारी यांना वरील प्रकार सांगीतल्याने त्यांनी लगेच पोलीस स्टेशनला हजर असलेले पोकॉ/१२५६ चेतन महाजन, पोकॉ/२२४३ किरण पारधी, पोकॉ/३५३ किशोर माळी अशांना सोबत घेवुन लागलीच लासुर ते हातेड रस्तावर येवुन तेथील स्थानिक नागरिक नरेंद्र मोरे, प्रमोद शिरसाठ यांचे मदतीने नाकबंदी करुन सत्रासेन नाक्यावरुन लोखंडी थांबा तोडुन येणारी कार व त्यामधील दोन इसमांना पकडले त्यांचेकडे विचारपुस करता त्यांची नावे पांचाराम सोनाराम विश्नोई रा. उदासर, ता. गुडामालाणे, जि. बडमोर, राजस्थान, व सुरेशकुमार गोपालराम कुमार रा. रणोदर, ता. चितलवाडा जि. जिल्लोर, राजस्थान असे असल्याचे समजले तसेच आरोपीतांकडुन ते त्यांचे पाठीमागे अफु या अंमलीपदार्थाची वाहतुक करणाऱ्या महिंद्रा XUV५००, MH १२, LD ८१४१ कारच्या पुढे वॉचर म्हणुन तीचे पुढे-पुढे चालत असल्याचे व सदर महिंद्रा XUV५००, MH १२, LD ८१४१ कार ही रोहिणी भोटेक , ता. शिरपुर, जिल्हा धुळे याठिकाणी अपघात होवुन पलटी झाली असुन त्यामध्ये अफु हा अंमलीपदार्थाच्या झाडाची बोंडे मिळुन आल्याने व सदर ठिकाणी सांगवी पोलीस पोहचल्याने व त्यांची महिंद्रा XUV५००, MH १२, LD ८१४१ , कारवर पुढील कारवाई करत असल्याने पोलीस निरीक्षक अनिल भवारी व त्यांच्या टिमने पकडलेले स्विप्ट कार क्रमांक GJ ०६, LS ००७५, मधील दोन आरोपी हे सांगवी पोलीस स्टेशनच्या ताव्यात पुढील कारवाईकामी देण्यात आले आहेत. पुढील कारवाई सांगवी पोलीस, जिल्हा धुळे हे करीत आहेत.


IND
GJ06LS0075





